# इयत्ता ११वी केंद्रीय प्रवेश समिती २०१३

## प्रसिध्दी-पत्रक

**ए.टी.के.टी. प्रवेश अर्ज प्राप्त झालेल्या विद्यार्थ्यांच्या संदर्भात प्रवेशाचे वेळापत्रक खालीलप्रमाणे**

| अ.क्र. | दिनांक | तपशील |
|---|---|---|
| १ | २२/७/२०१३ | चेकलिस्ट सायं ६.०० वाजता संकेतस्थळावर प्रसिदध करण्यात येईल. |
| २ | २३/७/२०१३ | चेकलिस्ट मधील माहितीच्या त्रुटीबाबत आक्षेप नोंदविणे. (स्थळ - आबासाहेब गरवारे महाविद्यालय, कर्वे रोड, पुणे - वेळ सकाळी ११.०० ते सायं ५.००) |
| ३ | २५/७/२०१३ | ए.टी.के.टी. गुणवत्ता यादी संकेतस्थळावर सायंकाळी ६.०० वा. प्रसिदध करण्यात येईल. |
| ४ | २७/७/२०१३ | ए.टी.के.टी. गुणवत्ता यादीतील अनुक्रमांक १ ते ८०० विद्यार्थ्यांना टेबल पदधतीने प्रवेश देण्यात येतील. (स्थळ - आबासाहेब गरवारे महाविद्यालय, कर्वे रोड, पुणे - वेळ सकाळी ९.३० ते शेवटच्या विद्यार्थ्याच्या प्रवेशापर्यंत) |
| ५ | २९/७/२०१३ | ए.टी.के.टी. गुणवत्ता यादीतील अनु. क्र. ८०१ ते १४७२ विद्यार्थ्यांना टेबल पदधतीने प्रवेश देण्यात येतील. (स्थळ - आबासाहेब गरवारे महाविद्यालय, कर्वे रोड, पुणे - वेळ सकाळी ९.३० ते शेवटच्या विद्यार्थ्याच्या प्रवेशापर्यंत) |

**ए.टी.के.टी. च्या विद्यार्थ्यांनी प्रवेशासाठी घ्यावयाची दक्षता -**

१. ए.टी.के.टी. च्या विद्यार्थ्यांनी त्यांच्या गुणवत्तेनुसार नेमून दिलेल्या दिनांकास वेळेवर उपस्थित रहावे.

२. प्रवेशासाठी येताना इयत्ता १०वी ची गुणपत्रिका, शाळा सोडल्याचा दाखला, जात प्रमाणपत्र व विशेष आरक्षण प्रमाणपत्र यांच्या मूळ प्रती व झेरॉक्स प्रति (छायांकित) सोबत आणाव्यात.

Sd/-

**(श्रीमती सुमन शिंदे)**
**अध्यक्ष**
**इयत्ता ११वी केंद्रीय प्रवेश समिती २०१३ तथा**
**उपसंचालक**
**पुणे विभाग, पुणे**

# इयत्ता ११वी केंद्रीय प्रवेश प्रक्रिया, पुणे,२०१३-२०१४

# प्रसिद्धि पत्रक

इयत्ता ११वी केंद्रीय प्रवेश समिती मार्फत दिनांक २७ /७/२०१३ पासून ए.टी.के.टी. पात्र विद्यार्थ्यांसाठी टेबल पद्धतीने प्रवेश देणार आहेत. तत्पूर्वी खालील कारणासाठी प्रवेश घेऊ न शकलेल्या विद्यार्थ्यांसाठी प्रवेश देण्याचे निश्चित केलेले आहे.

**प्राधान्यक्रम चुकलेल्या ३०१ विद्यार्थ्यांच्या प्रवेशाबाबत --**

३०१ विद्यार्थ्यांनी मिळालेल्या गुणांचा विचार न करता, जास्त गुणांचे कट ऑफ असलेल्या सर्व कॉलेजेस चे कोड क्रमांक टाकल्यामुळे त्यांना प्रवेश प्रस्तावित करता आलेला नव्हता. अशा सर्व विद्यार्थ्यांना प्रतिक्षा यादी १ व प्रतिक्षा यादी २ मध्ये प्रवेशासाठी प्रस्तावित करण्यात आलेले आहे. तथापि अजूनही ६० विद्यार्थ्यांना प्रवेश प्रस्तावित करता आलेले नाहीत. अशा विद्यार्थ्यांचे प्रवेश त्याचप्रमाणे,

**शाळा व क. महाविद्यालयातील बंद झालेल्या तुकड्या --**

शैक्षणिक वर्ष २०१३-२०१४ मध्ये काही कनिष्ठ महाविद्यालयांसाठी विद्यार्थ्यांनी प्राधान्यक्रमात पसंति न दिल्याने संबंधित क. महाविद्यालयातील तुकड्यांचे प्रवेश झालेले नाहीत. जे प्रवेश झालेले आहेत ते अत्यंत कमी आहेत. त्यामुळे सदरच्या तुकड्या चालवणे शक्य नसल्याने फक्त अशाच कनिष्ठ महाविद्यालयात प्रस्तावित केलेल्या विद्यार्थ्यांचे प्रवेश, आणि

**जवळच्या नातेवाईकाच्या दुर्दैवी निधनामुळे प्रवेश कालावधीत प्रवेश घेऊ न शकलेल्या विद्यार्थ्यांच्या प्रवेशाबाबत --**

दि. १६/७/२०१३ ते दि. १९/७/२०१३ या कालावधीत ज्या विद्यार्थ्यांना त्यांच्या जवळच्या नातेवाईकाच्या निधनामुळे दुर्दैवाने प्रवेश घेता आला नाही, फक्त अशाच विद्यार्थ्यांचे प्रवेशासाठी खालील दिनांकास उपस्थित रहावे. **(संबंधित विद्यार्थ्यांनी नातेवाईकाच्या मृत्युचा दाखला प्रवेशाच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे. )**

**फक्त अशा प्रकरणातील संबंधित विद्यार्थ्यांनी अर्जाची पोहोच, मूळ कागदपत्रे व त्याच्या छायांकित प्रतींसह पडतळणीसाठी दि. २५/७/२०१३ रोजी सकाळी ११.०० वा. आबासाहेब गरवारे महाविद्यालय, पुणे येथे उपस्थित रहावे. सदरहू पडताळणी करून घेतलेल्या विद्यार्थ्यांनी प्रवेशासाठी दि. २७/७/२०१३ रोजी सकाळी ११.०० वाजता आबासाहेब गरवारे महाविद्यालय, पुणे येथे उपस्थित रहावे.**

Sd/-

**(श्रीमती सुमन शिंदे)**
**अध्यक्ष**
**इयत्ता ११वी केंद्रीय प्रवेश समिती २०१३ तथा**
**उपसंचालक**
**पुणे विभाग, पुणे**